नि.दि.दा. क्र.५७०/२०१९
माणिक गाजरे वि. राजेंद्र पाटील

<u>निशाणी २१ खालील आदेश.</u>
(पारित दिनांक २०.११.२०२१.)

प्रतिवादींनी प्रस्तूतचा अर्ज प्रतिवादी क्र.१.३, १.६ व १.७ यांनी कैफियत व म्हणणे दाखल करण्यास झालेला विलंब माफ करण्याबाब विनंती केली आहे.

२. वादींनी प्रस्तूत अर्जास म्हणणे दाखल करुन विरोध दर्शविला आहे.

३. प्रतिवादींच्या कथनानुसार प्रस्तूत प्रकरणात प्रतिवादी हे कोव्हीड १९ महामारीच्या काळात उपस्थित राहू शकत नव्हते, त्यामुळे मुदतीत कैफियत आणि म्हणणे दाखल करणे शक्य झाले नाही. आज रोजी अर्जा सोबत कैफियतीस म्हणे दाखल करत आहेत. प्रस्तूत प्रकरणात प्रतिवादी क्र.१.५ यांचा नोटीस समन्स बजावणी झालेली नसुन ते स्वतः कोर्टात उपस्थीत आहेत. तरी कैफियत म्हणण दाखल करण्यास झालेला विलंब माफ करण्यात येवून कैफियत म्हणणे स्विकारण्यात यावा अशी विनंती केली आहे.

४. वादींच्या कथनानुसार प्रस्तूत अर्जातील मजकूर खरा व कायदेशीर नसून वस्तुस्थितीला धरुन नाही. प्रतिवादी हजर झाले तेंव्हा महामारीची परिस्थिती नव्हती. या काळात प्रतिवादींनी कैफियत दिली नाही. वादीस न्याय मिळण्यास विलंब व्हावा व नाहक कोर्टात हेलपाटे व्हावे या हेतूने प्रतिवादीने जाणीवपुर्वक विलंब केला आहे. प्रतिवादींनी अर्जास दिलेले कारण समाधानकारक नाही. सबब प्रतिवादींचा अर्ज नामंजूर व्हावा अशी विनंती वादींतर्फे करण्यात आली आहे.

५. वादी व प्रतिवादींतर्फे विद्वान वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

६. अर्ज व त्यावरील म्हणणे तसेच अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले. प्रस्तूतचा दावा हा कराराप्रमाणे पुर्तता होवून मिळण्यासाठी दाखल केला असून प्रस्तूत प्रतिवादी हे प्रतिवादी क्र.१ चे वारस आहेत. प्रस्तूत प्रतिवादी क्र.१.१ यांना दिनांक ०६.०३.२०२० रोजी तसेच १.३ यांना दिनांक २२.०१.२०२० रोजी समन्स बजावणी झाल्याचे दिसून येते परंतू प्रतिवादी क्र.१.१, १.२, १.४ व १.५ हे स्वतःहून दिनांक १२.०२.२०२१ रोजी हजर झाल्याचे स्पष्ट होते व त्याच दिवशी त्यांनी प्रस्तूतचा अर्ज

दाखल केल्याचेही दिसून येते. तरीही प्रतिवादी क्र.१.१ यांना समन्स लागू झाल्यानंतरचा कालावधी हा कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे न्यायालयीन कामकाजास प्रतिबंध झालेला कालावधी असल्याचे स्पष्ट होते. कारण मार्च २०२० नंतर फेब्रुवारी २०२१ मध्ये न्यायालयीन कामकजास सुरुवात झाल्याची बाब अधोरेखीत आहे. सबब प्रस्तूत प्रतिवादींनी फेब्रुवारी २०२१ मध्ये प्रस्तूतचा कैफियत दाखल करण्यास परवानगी मिळण्याबाबतचा अर्ज दाखल केल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे न्यायाचे कारणास्तव प्रस्तूतचा अर्ज मंजूर करणे न्यायप्राप्य आहे. सबब मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

प्रस्तूतचा अर्ज रुपये १००/– खर्चाने मंजूर करण्यात येत आहे.

(एस.एस.खरोशे.)

दिनांक २०.११.२०२१. सह. दिवाणी न्यायाधिश, क.स्तर, पंढरपूर

CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file Order are same, word to word, as per the original Order.

Name of the Stenographer : Rajiv Malkarjun Gogi.

Court : Jt. Civil Judge, J.D. Pandharpur.

Date : 20.11.2021.
Signed by the presiding officer on : 20.11.2021
Uploaded on : 22.11.2021.